# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 08/06/2020 (सोमवार)
(सकाळ)

### अवैधरीत्या देशी–विदेशी दारुची
### वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
### पो. स्टे. बोरीची कार्यवाही

पो.स्टे. बोरी :– दिनांक 07/06/2020 रोजी पो. स्टे. रोजी मधील पोलीस स्टाफ हे पो. स्टे. बोरी परिसरात पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त माहिती मिळाली की, वर्धा रोडवर एमएच–34/बीजी– 4126 क्रमांकाच्या एका बोलेरो पिकअप गाडी मध्ये अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक होणार आहे. अशा माहिती वरून पो. स्टे. बोरी पोलीस स्टाफने दिनांक 07/06/2020 चे 19.30 वा ते 20.30 वा. दरम्यान मौजा रूईखैरी शिवार हायवे, वाय पाईंट रोडवर नाकाबंदी केली. दरम्यान एक एमएच–34/बीजी– 4126 क्रमांकाच्या बोलेरो पिकअप गाडी येतांना दिसली. सदर वाहनाला थांबवुन तपासले असता वाहनात आरोपी नामे क्र. 1) अमोल उर्फ अमर गुलाबराव गेडाम, वय 29 वर्ष, रा. समुद्रपुर व 2) आकाश ज्ञानेश्वर लालसेर, वय 22 वर्ष, रा. कवठा, ता. समुद्रपुर जि वर्धा यांच्या ताब्यातुन देशी दारूच्या 15 पेटया कि. 43,200/–रू., विदेशी दारूच्या 2 पेटया कि. 3540/–रू. बीअर, 1 बोलेरो पिकअप गाडी कि. 4,00,000/–रू. असा एकुण किंमती 4,46,740/–रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. पो. स्टे बोरी येथे गुन्हा दाखल आहे. यातील आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे पोहवा मिलींद नांदुरकर, पो. स्टे. बोरी यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 65 (अ) ई महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री भारती 8329306178 हे करीत आहेत.

सदरची कार्यवाही ही नागपुर (ग्रामिण) पोलीस अधिक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधिक्षक श्रीमती मोनिका राऊत, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. राजेंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन बोरीचे ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री. आसिफराजा. बी. शेख, पोलीस उपनिरीक्षक श्री. भारती, पोहवा. नांदुरकर, पोना सत्येन्द्र रंगारी, पोशि., पोशि अमृत किंनगे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.



पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर